# मेट्रो कारशेडला प्रतिबंध नाही

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या (नॅशनल पार्क) १०० मीटर परिसरात नव्या प्रकल्पांना राष्ट्रीय हरित लवादाने बंदी घातली आहे. मात्र मेट्रो-३ कारडेपो उभारणीसाठी कोणताही मनाई आदेश दिलेला नाही, बुधवारी पुणे येथे लवादापुढे झालेल्या सुनावणीत ही बाब स्पष्ट झाली, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने सांगण्यात आले.

दिल्ली, कोलकाता व अन्य मेट्रोच्या कारडेपोसाठी किती जागा लागली याचा तपशील देण्याचे निर्देश लवादाने मेट्रो कॉर्पोरेशनला दिले. १९ जानेवारी रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीत कॉर्पोरेशनतर्फे तपशील देण्यात येईल. लवादाने दिलेले निर्देश हे मेट्रो-३साठी सकारात्मक आहेत, असे कॉर्पोरेशनच्या अश्विनी भिडे यांनी सांगितले.